**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 05.06.2024** **वार – बुधवार**

---

**<u>गुणपत्रिका</u>**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीनं या मार्च महिन्यात घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेच्या गुणपत्रिका येत्या मंगळवारी 11 जून रोजी दुपारी 3 वाजता विद्यार्थ्यांना त्यांच्या संबंधित शाळेत वितरित केल्या जाणार आहेत. या परीक्षेचा निकाल २७ मे रोजी ऑनलाइन पद्धतीने जाहीर करण्यात आला होता.

**<u>वृक्षारोपण</u>**

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या वतीनं वृक्षारोपण करुन जागतिक पर्यावरण दिवस आज साजरा करण्यात आला. आपल्या पर्यावरण संरक्षणासाठी जगभरातील जागरुकता आणि कृती जोपासणे हे संयुक्त राष्ट्रांचे मुख्य उद्दीष्ट आहे. समुद्री प्रदुषण आणि जागतिक तापमानवाढीपासून उदयोन्मुख पर्यावरणविषयक समस्या, शाश्वत वापर आणि वन्यजीव गुन्हेगारीबद्दल जागरुकता वाढविण्याकरिता हे प्रमुख अभियान आहे.

दरवर्षी 143 देशांमध्ये हा दिवस उत्साहात साजरा केला जातो. प्रत्येक वर्षी नवीन संकल्पना ठरविण्यात येते. यातून प्रमुख कंपन्या, स्वयंसेवी संस्था, आणि समुदाय, जगभर पर्यावरणीय कामांना प्रोत्साहन देत असतात. यावर्षीच्या जागतिक पर्यावरण दिवसाची मध्यवर्ती संकल्पना जमीन पुनःस्थापित करणे, दुष्काळात टिकून राहणे आणि वाळवंटीकरणाची वाढ रोखणे अशी आहे.

**<u>शून्य</u>**

पुण्यातील  लष्कराच्या दक्षिण कमांडनं वर्ष 2047 हे निव्वळ शून्य कार्बन उत्सर्जन वर्ष म्हणून साजरे करण्याची घोषणा केली आहे. वर्ष 2070 पर्यंत 'नेट झिरो भारत' अर्थात निव्वळ शून्य कार्बन उत्सर्जन करणारा भारत असा दर्जा प्राप्त करण्याच्या भारत सरकारच्या ध्येयाशी सुसंगत राहून हा संकल्प करण्यात आला आहे. या अनुषंगानं 15 ऑगस्ट 2047 पर्यंत 'नेट झिरो सदर्न कमांड' दर्जा प्राप्त करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

**पिंचि**

जागतिक पर्यावरण दिनाच्या अनुषंगानं पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने  आजपासून १२ जूनपर्यंत उद्यान, वृक्षारोपण विभाग आणि देवराई फाऊंडेशनच्या वतीनं निगडी इथल्या दुर्गादेवी टेकडी उद्यानात भव्य वृक्षारोपण कार्यक्रम तसंच नागरिकांना १० हजार वृक्षरोपांचं वाटप करण्यात येणार आहे. या काळात विविध पर्यावरणपूरक उपक्रम राबवण्यात येणार असल्याची माहिती पालिका आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.

**निरंकारी**

संत निरंकारी मिशन आणि लोणावळा नगरपरिषद यांच्याद्वारे संयुक्तपणे ‘बीट प्लास्टिक पोल्युशन’   या विषयाला अनुसरुन जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आज  १८ पर्वतीय पर्यटन स्थळांवर विशाल वृक्षारोपण आणि स्वच्छता अभियान राबविण्यात आलं. यामध्ये महाराष्ट्रातील लोणावळा, खंडाळा, महाबळेश्वर,पाचगणी,पन्हाळा,सोमेश्वर या पर्यटन स्थळांचा समावेश होता. पुणे क्षेत्रिय संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या माध्यमातून लोणावळा, खंडाळा इथल्या मुंबई-पुणे महामार्गाच्या दोन्ही बाजूचे रस्ते, खंडाळा ते अमृतांजन पॉईंट, वळवण, कावेरी फार्म, नागरगाव, लोहगड उद्यान, रायवूड ते लोणावळा डॅम गेट, राजमाची, तुंगार्ली चौक ते ग्रामीण पोलीस स्टेशन, नगरपरिषद कार्यालय, मावळा पुतळा या ठिकाणी स्वयंसेवक, सेवादल सदस्य, भक्तगण आणि लोणावळा नगरपरिषदेचे कर्मचारी यांनी एकत्रितपणे येऊन संपूर्ण परिसर स्वच्छ केला. तसंच १०० हून अधिक झाडं लावण्यात आली. पथफेरी

आणि पथनाट्यं सादर करून तसंच सर्व स्वयंसेवकांनी हातामध्ये पर्यावरण रक्षणविषयक घोषणा फलक उंचावून मानवी साखळी निर्माण करत  नागरिकांमध्ये वायू प्रदूषण रोखण्याविषयी जनजागृती केली. संत निरंकारी मिशनचे पुणे क्षेत्रीय संचालक किशनलाल अडवाणी आणि अवनीत तावरे  यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान राबविण्यात आले.

**फूट**

नारायण सेवा संस्थानतर्फे  पुण्यातील दिव्यांगांच्या कल्याणासाठी रविवार नऊ  जून रोजी क्वीन्स गार्डन अल्पबचत भवन इथं सकाळी ८ ते संध्याकाळी ६ यावेळेत मोफत नारायण कृत्रिम अंग शिबिराचं आयोजन करण्यात आलं आहे.  हात-पाय काही अपघात किंवा आजारामुळं निकामी होऊन अपंगत्व आलं आहे, अशा व्यक्तिंसाठी हे शिबीर असल्याचं संस्थानचे विश्वस्त संचालक देवेंद्र चौबिसा यांनी सांगितलं. दर्जेदार आणि वजनानं हलके आणि टिकाऊ असे नारायण कृत्रिम हात, पाय आणि कॅलिपरचे मोफत वितरण दोन महिन्यांनंतर करण्यात येणार आहे.

**मैदानी**

नागपूर इथं पार पडलेल्या वरिष्ठ गटाच्या राज्यस्तरीय मैदानी अजिंक्यपद स्पर्धेत पुणे जिल्हा संघानं सर्वसाधारण विजेतेपद पटकावत स्पर्धेवर वर्चस्व राखलं.

पुणे आणि परिसरात काल संध्याकाळच्या मुसळधार पावसानंतर आज दिवसभरात चांगला उष्मा होता. आज संध्याकाळीही गडगडाटी पावसाचा इशारा पुणे वेधशाळेनं दिला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**